# प्रकरण सहावे

# निष्कर्ष व शिफारशी

# प्रकरण सहावे

## विभाग अ

## निष्कर्ष


| | |
|---|---|
| ६.०१ | प्रास्ताविक |
| ६.०२ | शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष |
| ६.०३ | अध्यापन केले जात असलेल्या विषयाचे प्रमाण |
| ६.०४ | मूल्यशिक्षण प्रशिक्षण ( उद्‌बोधन वर्ग ) साठीचे निष्कर्ष |
| ६.०५ | मूल्यशिक्षण कार्यवाही |
| ६.०५.०१ | शालेय परिपाठ |
| ६.०५.०२ | श्रमप्रतिष्ठा उपक्रमासाठी निष्कर्ष |
| ६.०५.०३ | वैज्ञानिक दृष्टिकोन उपक्रमासंबंधी निष्कर्ष |
| ६.०५.०४ | वक्तशीरपणा उपक्रमासंबंधी निष्कर्ष |
| ६.०५.०५ | स्त्री-पुरुष समानता उपक्रमासंबंधी निष्कर्ष |
| ६.०६ | मूल्यशिक्षण, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांचा संबंध |
| ६.०७ | मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन |
| ६.०८ | मुख्याध्यापक वैयक्तिक माहिती विषयी निष्कर्ष |
| ६.०९ | मूल्यशिक्षण नियोजनाबाबत निष्कर्ष |
| ६.१० | मूल्यशिक्षणाची प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी प्रशिक्षण वर्गासाठीचे निष्कर्ष |
| ६.११ | विद्यालयामध्ये राबविण्या जाणा-या उपक्रमांबद्दल निष्कर्ष |
| ६.१२ | मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारी भौतिक सुविधांबाबत निष्कर्ष |
| ६.१३ | मूल्यशिक्षण कार्यवाहीवर परिणाम करणा-या घटकांवरती निष्कर्ष |
| ६.१४ | मूल्यशिक्षणामुळे एस्.एस्.सी. परीक्षेवर होणा-या परिणामांवरती निष्कर्ष |
| ६.१५ | विद्यालयांना दिलेल्या भेटी व निरक्षणातील माहितीचे निष्कर्ष |
| ६.१६ | पर्यवेक्षक व तज्ज्ञ यांच्या मुलाखती मधून निघालेले निष्कर्ष |

# विभाग ब

## शिफारशी

| | |
|---|---|
| ६.१७ | मूल्यशिक्षण प्रशिक्षण ( उद्बोधन वर्गाबाबत ) शिफारशी |
| ६.१८ | मूल्यशिक्षण कार्यवाहीबाबत शिफारशी |
| ६.१८.०१ | शालेय परिपाठाविषयी शिफारशी |
| ६.१८.०२ | श्रमप्रतिष्ठा या उपक्रमाविषयी शिफारशी |
| ६.१८.०३ | वैज्ञानिक दृष्टिकोन या उपक्रमाविषयी शिफारशी |
| ६.१८.०४ | वक्तशीरपणा या उपक्रमाविषयी शिफारशी |
| ६.१८.०५ | स्त्री-पुरुष समानता उपक्रमाविषयी शिफारशी |
| ६.१९ | मूल्यशिक्षण, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांविषयी शिफारशी |
| ६.२० | मूल्यसंक्रमण व मूल्यमापन याविषयी शिफारशी |
| ६.२१ | मूल्यशिक्षण वार्षिक नियोजनाविषयी शिफारशी |
| ६.२२ | मूल्यशिक्षण व शिक्षकांचे उद्बोधन यासाठी शिफारशी |
| ६.२३ | विद्यालयामध्ये मूल्यशिक्षणांच्या राबविल्या जाणा-या उपक्रमांविषयी शिफारशी |
| ६.२४ | मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणा-या भौतिक सुविधांविषयी शिफारशी |
| ६.२५ | मूल्यशिक्षण कार्यवाहीबाबत शिफारशी |
| ६.२६ | मूल्यशिक्षणामुळे एस्.एस्.सी. परीक्षेवरती होणा-या परिणामांविषयी शिफारशी |

# विभाग क

## पुढील संशोधनासाठी विषय

| | |
|---|---|
| ६.२७ | प्राथमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षण कार्यवाहीचा चिकित्सक अभ्यास |
| ६.२८ | माध्यमिक शाळांमध्ये अध्यापन करणा-या अध्यापकांच्या मूल्यशिक्षण विषयाच्या दृष्टिकोनातून चिकित्सक अभ्यास |
| ६.२९ | प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणामुळे होणा-या परिणामांचा चिकित्सक अभ्यास |
| ६.३० | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांवरती शालाबाहय परिस्थितीचा मूल्यशिक्षणावरती होणा-या परिणामांचा चिकित्सक अभ्यास |
| ६.३१ | उच्चमाध्यमिक स्तरावरती मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असतांना येणा-या समस्यांचा चिकित्सक अभ्यास |

# प्रकरण सहावे

## विभाग " अ " निष्कर्ष

## ६.०१ प्रास्ताविक

प्रकरण १ ते ४ मध्ये माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाच्या कार्यवाहीचा आढावा घेतला आहे. ही प्रकरणे तात्विक स्वरूपाची आहेत. प्रकरण ५ मध्ये मुख्याध्यापक, शिक्षक, पर्यवेक्षक, शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य, जेष्ठ तज्ञ प्राध्यापक, शासकीय अधिकारी यांच्या प्रतिसादातून आणि माध्यमिक विद्यालयांना दिलेल्या भेटी व केलेली निरीक्षणे यांतून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व विशदीकरण केले आहे. या प्रकरणाच्या आधारे आभ्यासकाने प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष व शिफारशी दिल्या आहेत.

शिक्षक प्रश्नावली, मुख्याध्यापक प्रश्नावली मध्ये जे प्रश्न सारख्या आशयाचे आहेत त्यांचे निष्कर्ष एकत्र नोंदविले आहेत.

## ६.०२ शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष -

प्रकरण ५ मधील प्रश्नावली भरून देणाऱ्या शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयी विचार केला. प्रश्नावलीमधून आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अर्थ लावल्यानंतर शिक्षकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेविषयी खालील निष्कर्ष निघतात.

१. माध्यमिक शाळांमध्ये अध्यापनासाठी आवश्यक अर्हता बी. ए. बी. एड. किंवा बी. एस्सी. बी. एड. ही ७४ पैकी ६३ टक्के शिक्षकांनी मिळविली आहे. ही बाब संशोधनाच्या दृष्टीने समाधानकारक आहे.
२. माध्यमिक शाळांमध्ये अध्यापनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्हतेपेक्षा अधिक आर्हता ७४ पैकी ३३ टक्के शिक्षकांनी मिळविली आहे. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| बी. ए. एम. एड. | ३ टक्के |
| बी. एस्सी. एम. एड. | ४ टक्के |
| एम. ए. बी. एड. | २२ टक्के |
| एम. एस्सी. बी. एड. | १ टक्का |
| एम. ए. एम. एड. | ३ टक्के. |

३. माध्यमिक शाळांमध्ये अध्यापनासाठी आवश्यक असणाऱ्या अर्हतेपेक्षा कमी शैक्षणिक अर्हता ४ टक्के शिक्षकांच्या जवळ आहे.

४. माध्यमिक शाळांमध्ये अध्यापन करत असणाऱ्या अध्यापकांच्या अनुभवांची सरासरी ही १३.३१ म्हणजेच १३ वर्षे एवढी आहे.

## ६.०३ अध्यापन केले जात असलेल्या विषयांचे प्रमाण -

१. मूल्यशिक्षण आणि शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांचा घनिष्ठ संबंध आहे. विविध विषयांमध्ये वेगवेगळी मूल्ये आहेत. त्यासाठी वेगवेगळ्या विषयांचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे शेकडा प्रमाण खालीलप्रमाणे दिसून आले.

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी | २० टक्के | भूगोल | ७ टक्के |
| हिंदी | ११ टक्के | अर्थशास्त्र | ८ टक्के |
| इंग्रजी | १६ टक्के | विज्ञान | १८ टक्के |
| इतिहास | ९ टक्के | गणित | १८ टक्के |

वरील विविध विषयांच्या प्रमाणावरून असे निदर्शनास येते की, संशोधकाने ज्या चार मूल्यांवरती म्हणजेच श्रमप्रतिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री-पुरूष समानता, वक्तशीरपणा यांवरती लक्ष केंद्रीत केले आहे त्या मूल्यांची जाणीव वरील विषयांचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांमध्ये आहे.

## ६.०४ मूल्यशिक्षण प्रशिक्षण (उद्‌बोधन वर्ग) साठीचे निष्कर्ष -

१. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी (८१ टक्के) शिक्षकांना प्रशिक्षणाची (उद्‌बोधन वर्ग) आवश्यकता आहे असे आढळून आले. मूल्यशिक्षण कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी (१९ टक्के) शिक्षकांना प्रशिक्षणाची आवश्यकता वाटत नाही. आवश्यकता आहे म्हणणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण लक्षात घेता परिणामकारक कार्यवाहीसाठी प्रशिक्षण वर्ग घेणे अधिक चांगले.

२. मूल्यशिक्षण उपक्रमांसाठी प्रशिक्षण (३९ टक्के) शिक्षकांनी पूर्ण केले आहे तर (६१ टक्के) शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले नाही. प्रशिक्षण न घेतलेल्या शिक्षकांचे प्रमाण अधिक आहे असे दिसून येते.

३. शैक्षणिक संस्थांनी (४१ टक्के) वाटा प्रशिक्षण देण्यासाठी उचललेला आहे. त्यामध्ये शिक्षण प्रसारक मंडळ, अकलूज संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

४. प्रशिक्षण देण्यासाठी (५५ टक्के) वाटा हा शासनाने उचलल्याचे आढळून आले, पण त्याचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

५. सामाजिक संस्थांनी (४ टक्के) वाटा हा प्रशिक्षण देण्यासाठी उचललेला आहे असे आढळून आले, पण त्याचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

६. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिक्षकांचे प्रमाण (३९ टक्के) आहे. प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्यांचे एकून दिवस व शेकडा प्रमाण खालीलप्रमाणे आढळून आले.

हे प्रमाण शिक्षक व मुख्याध्यापक प्रश्नावली प्रतिसादावरून काढले आहे

| एकूण दिवस | शिक्षक प्रतिसाद शेकडा प्रमाण | मुख्याध्यापक प्रतिसाद शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| २ | ४५ टक्के | ५७ टक्के |
| ३ | ५२ टक्के | २४ टक्के |
| १० | ३ टक्के | १९ टक्के |
| एकही दिवस नाही | ६१ टक्के | |

७. दहा दिवस प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण (३ टक्के) आहे. पण या प्रशिक्षणामध्ये फक्त मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव नव्हता असे आढळून आले.

८. दोन व तीन दिवसांचे प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांचे शेकडा प्रमाण अनुक्रमे (४५ टक्के) व (५२ टक्के) आहे.

९. पंचावन्न टक्के शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण केल्यामुळे मूल्यशिक्षणाची संकल्पणा स्पष्ट झाली.

१०. चोवीस टक्के शिक्षकांना मूल्यशिक्षकांना मूल्यशिक्षणाची कार्यवाही कशा प्रकारे करावी ते समजले.

११. दहा टक्के शिक्षकांना मूल्यसंक्रमणाची दिशा मिळाली तर सात टक्के शिक्षकांना मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन कसे करावे ते समजले.

१२. मूल्यशिक्षण प्रशिक्षणामुळे इतर अप्रशिक्षीत शिक्षकांना माहिती देता आली असे (४ टक्के) शिक्षकांना वाटते.

मूल्यशिक्षणाची कार्यवाही सुव्यवस्थीतपणे होण्यासाठी संस्था, शासकीय व सामाजिक संस्थांनी पुढे येणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे शिक्षकांना मूल्यशिक्षण कार्यवाहीचे स्वरूप अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होणार आहे.

१३. एकाहत्तर टक्के शिक्षकांना मूल्यशिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळाली नाही असे शिक्षकांसाठीच्या प्रश्नावलीमधून दिसून येते तर २५ शाळांमध्ये १९ टक्के शिक्षकांना प्रशिक्षण मिळाले नाही असे मुख्याध्यापक प्रश्नावली मधून दिसून येते. ज्या अधिक शिक्षकांना प्रशिक्षण मिळाले आहे ते प्रतिसादक नाहीत असे स्पष्ट होते.

१४. एकाहत्तर टक्के शिक्षकांना प्रशिक्षण न घेतल्यामुळे अडचणी जाणवतात तर २९ टक्के शिक्षकांना अडचणी जाणवत नाहीत.

१५. अकरा टक्के शिक्षकांना मूल्यशिक्षणाची संकल्पना स्पष्ट झाली नाही. ३६ टक्के शिक्षकांना मूल्यशिक्षणाचा विस्तार समजला नाही. अठरा टक्के शिक्षकांना उपक्रमांचे नियोजन करता येत नाही. ११ टक्के शिक्षकांना मूल्यसंक्रमणाचे नियोजन करताना अडचणी जाणवतात. सात टक्के शिक्षकांना मूल्यसंक्रमणात एकसूत्रता आणताना अडचणी जाणवतात. नऊ टक्के शिक्षकांना नवीन मुद्यांचा समावेश मूल्यशिक्षणामध्ये करताना अडचणी जाणवतात.

## ६.०५ मूल्यशिक्षण कार्यवाही

### ६.०५.०१ शालेय परिपाठ -

१. शंभर टक्के विद्यालयांमध्ये शालेय परिपाठ उपक्रमांतर्गत राष्ट्रगीत, प्रार्थना, प्रतिज्ञा हे उपक्रम घेतले जातात.

२. पंच्याऐंशी टक्के विद्यालयांमध्ये सुविचार कथन, दिनविशेष, समुहगीत हे उपक्रम शालेय परिपाठांतर्गत घेतले जातात.

३. शहात्तर टक्के विद्यालयांमध्ये शालेय परिपाठ उपक्रमांतर्गत आजची विशेष बातमी, कथाकथन / चिंतन / विद्यार्थी मनोगत, उल्लेखनीय घटना, विशेष दिन, शिक्षक / मुख्याध्यापक मार्गदर्शन, शाळा सुटताना वंदे मातरम् हे उपक्रम राबविले जातात, हे प्रमाण अधिक असले तरी सुद्धा प्रमाण वाढणे आवश्यक आहे. मूल्य संक्रमणाची दिशा या उपक्रमांवरून ठरणार आहे.

४. पंचेचाळीस टक्के विद्यालयांमध्ये शालेय परिपाठ उपक्रमांतर्गत पसायदान / मनाचे श्लोक उपक्रम घेतले जातात. हे प्रमाण खूपच कमी आहे.

### ६.०५.०२ श्रमप्रतिष्ठा उपक्रमासाठी निष्कर्ष -

१. श्रमप्रतिष्ठा मूल्यसंक्रमणासाठी शालेय परिसर स्वच्छता (९३ टक्के), ग्रामसफाई (७३ टक्के), वर्ग स्वच्छता व वृक्षारोपन (८२ टक्के) हे उपक्रम राबविले जातात.

२. श्रमप्रतिष्ठा मूल्यसंक्रमणासाठी श्रमदान शिबीर (५८ टक्के) हा उपक्रम राबविला जातो. हे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. श्रमदान शिबीर घेतल्यामुळे मुलांना श्रमदानाचे महत्व अधिक प्रमाणात समजावून देण्यास मदत होते.

३. श्रमप्रतिष्ठा हा उपक्रम राबविताना (४२ टक्के) शिक्षकांना अडचणी जाणवतात तर (५८ टक्के) शिक्षकांना कोणत्याही स्वरूपाच्या अडचणी जाणवत नाहीत. अडचणी जाणवण्याचे अधिक नसले तरी सुद्धा उपक्रमांची कार्यवाही अधिक चांगल्या प्रमाणात होण्यासाठी अडचणीचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

४. शाळामध्ये श्रमप्रतिष्ठा उपक्रम राबविताना (३९ टक्के) शिक्षकांना साहित्याची अडचण जाणवते. विद्यार्थ्यांना काम करताना कमीपणा वाटतो असे (२६ टक्के) शिक्षकांना वाटते. विद्यार्थी काम करण्यास उत्सुक नसतात असे (१९ टक्के) शिक्षकांना वाटते. पालकांना श्रमाचे महत्व पटत नाही असे (१० टक्के) शिक्षकांना वाटते. उपक्रम राबविताना वेळ कमी पडतो असे (६ टक्के) शिक्षकांना वाटते.

वरील वेगवेगळ्या कारणांवरून असे निदर्शनास येते की, श्रमप्रतिष्ठा उपक्रम राबविताना मुख्य अडचण ही साहित्याची व विद्यार्थ्यांमध्ये श्रमाचे महत्व पटवून देणे ही आहे.

५. बत्तीस टक्के शिक्षक श्रमप्रतिष्ठा उपक्रमासाठी लागणारे साहित्य विद्यार्थ्यांना घरून आणण्यास सांगतात.

६. पंचेचाळीस टक्के शिक्षक श्रमाचे महत्व पटवून देतात. हे प्रमाण आणखी वाढणे आवश्यक आहे.

७. तेरा टक्के शिक्षक विद्यार्थ्यांचे गट पाडून कामाची विभागणी करतात. गट पाडल्यामुळे श्रमाची विभागणी होते व त्यामुळे विद्यार्थ्यांना काम करण्यास आनंद वाटतो.

८. सहा टक्के शिक्षक शिक्षक पालक सभांचे आयोजन करतात. त्याच प्रमाणे शाळांच्या वेळा व्यतिरिक्त वेळ देऊन उपक्रम राबविण्याचे प्रमाण तेच आहे.

## ६.०५.०३ वैज्ञानिक दृष्टिकोन उपक्रमासंबंधी निष्कर्ष -

१. वैज्ञानिक दृष्टिकोन या उपक्रमांतर्गत वैज्ञानिक उपकरणे तयार करणे, वृक्षदिंडी, पर्यावरण दिन, व्यसनमुक्ती फेरी यांचे आयोजन करणे, प्रथमोपचार, सामान्य औषधे, संसर्गजन्य रोगांवरील प्रतिबंधक उपचार मुलांना समजावून देणे, विज्ञानावरील नियतकालिके, वृत्तपत्रातील लेखांची कात्रणे यांचे सामुहिक वाचन करणे यासाठी ज्या शिक्षकांनी प्रतिसाद नोंदविला आहे त्याचे सरासरी शेकडा प्रमाण ८६ टक्के च्या वरती आहे. ही बाब संशोधनाच्या दृष्टिने समाधानकारक आहे.

२. सत्तर टक्के शिक्षकांनी औषधी वनस्पतींचे गुणधर्म समजावून देणे व आरोग्य सप्ताह साजरा करणे यांसाठी प्रतिसाद दिला आहे.

३. वैज्ञानिक दृष्टिकोन उपक्रम राबविताना (४९ टक्के) शिक्षकांना अडचणी जाणवतात तर (५१ टक्के) शिक्षकांना अडचणी जाणवत नाहीत असे दिसून आले. अडचणी जाणवण्याचे व न जाणवण्याचे प्रमाण जवळजवळ सारखे आहे. त्यामुळे अधिक चांगल्याप्रकारे उपक्रम राबविण्यासाठी अडचणींचे स्वरूप समजावून घेणे महत्वाचे आहे.

४. तेहत्तीस टक्के शिक्षकांना विज्ञानाचे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे अडचणी जाणवतात.

बावीस टक्के शिक्षकांना ग्रामीण भाग असल्यामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण अधिक आहे असे वाटते. सतरा टक्के शिक्षकांना वेळ अपूरा आहे असे वाटते. आठ टक्के शिक्षकांना विज्ञान मासिकांची अडचण जाणवते. सतरा टक्के शिक्षकांना विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबद्दल नावड असल्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करताना अडचण जाणवते. तीन टक्के शिक्षकांना पालक उत्साही नसतात असे वाटते.

वरील वेगवेगळ्या कारणांचा विचार करता विज्ञानाचे साहित्य अपुरे व विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबददल आवड नसणे ही मुख्य अडचण आहे असे स्पष्ट होते.

५. अठ्ठावीस टक्के शिक्षक विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील विविध संकल्पना स्पष्ट करून देतात. तेहत्तीस टक्के शिक्षक टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करतात. चौदा टक्के शिक्षक अंधश्रद्धा निर्मूलन होण्यासाठी प्रयत्न करतात. नऊ टक्के शिक्षक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करतात. अकरा टक्के शिक्षक तज्ञ व्यक्तीकडून माहिती मिळवितात. सहा टक्के शिक्षक, " शिक्षक पालक " सभांचे आयोजन करतात.

वरील वेगवेगळ्या उपाययोजनांचा विचार करता शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबद्दल प्रथम आवड निर्माण करणे आवश्यक आहे असे वाटते.

## ६.०५.०४ वक्तशीरपणा उपक्रमासंबंधी निष्कर्ष -

१. वक्तशीरपणा या उपक्रमांतर्गत शाळेत वेळेवर येणे यासाठी (१०० टक्के) शिक्षकांनी प्रतिसाद नोंदविला आहे. ९० टक्के शिक्षकांनी स्वतःचा दैनंदिन कार्यक्रम तयार करणे, त्यातील वेळापत्रक तंतोतंत पाळणे, फलकावर वक्तशीरपणाबद्दल सुविचार लिहिणे, वक्तशीरपणा नसल्याने होणाऱ्या दूष्परिणामांची माहिती देणे हे उपक्रम विद्यालयांमध्ये घेतले आहेत. गृहपाठ वेळच्या वेळी घेणे व तपासणे यांसाठी (९६ टक्के) शिक्षकांनी

प्रतिसाद नोंदविला आहे.

२. त्रेपन्न टक्के शिक्षकांना वक्तशीरपणा बद्दलचे उपक्रम राबविताना अडचणी जाणवतात तर ४७ टक्के शिक्षकांना कोणत्याही प्रकारची अडचण जाणवत नाही.

३. एकोनपन्नास टक्के शिक्षकांना शाळा घरापासून लांब असल्याने विद्यार्थ्यांस शाळेत येण्यास उशीर होतो असे वाटते. अठरा टक्के शिक्षकांना विद्यार्थी वेळेवर अभ्यास करत नाहीत असे वाटते. तेरा टक्के शिक्षकांना पालक विद्यार्थ्यांना घरगुती कामे सांगतात असे वाटते.

शिक्षकांनी वरील अडचणी सोडविण्यासाठी ज्या उपाययोजना केल्या त्यावरून खालील निष्कर्ष निघतात.

४. तेहत्तीस टक्के शिक्षक विद्यार्थ्यांना वक्तशीरपणाचे महत्व पटवून देतात. दहा टक्के शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एस. टी. बसच्या पासची सोय करून दिली. तेवीस टक्के शिक्षकांनी शिक्षक पालक संभांचे आयोजन करून

अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला. आठ टक्के शिक्षकांनी शाळेमार्फत माफक दरात शालेय साहित्य उपलब्ध करून दिले. पंधरा टक्के शिक्षकांनी मुलींना पंचायत समिती मार्फत सायकल मिळवून दिल्या. आठ टक्के शिक्षकांना विद्यार्थ्यांना सौम्य स्वरूपाची शिक्षा करावी वाटते.

## ६.०५.०५ स्त्री-पुरूष समानता उपक्रमासंबंधी निष्कर्ष -

१. ऐंशी टक्के शिक्षकांनी विद्यालयामध्ये कर्तृत्ववान स्त्री-पुरूषांचे समारंभपूर्वक कौतुक केले आहे. पस्तीस टक्के शिक्षकांनी सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना शाळेमध्ये राबविली आहे. सत्तावीस टक्के शिक्षकांनी ही योजना गावपातळीवर राबविण्यास प्रोत्साहित केले आहे. हे दोन्ही प्रमाण खूपच कमी आहे. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळण्यासाठी हे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

२. अठ्याऐंशी टक्के शिक्षकांनी वर्गातील बुजऱ्या मुला-मुलींना शालेय कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतले आहे. बहात्तर टक्के शिक्षक मुला-मुलींचे वाढदिवस सारख्याच उत्साहाने साजरे करतात. एकोनसत्तर टक्के शिक्षक मुला-मुलींना एकत्र करून सहभोजनाचे कार्यक्रम घेतात.

३. स्त्री-पुरूष समानता उपक्रम राबविताना (५७ टक्के) शिक्षकांना अडचणी जाणवतात तर (४३ टक्के) शिक्षकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी जाणवत नाहीत.

४. पंचावन्न टक्के शिक्षकांना ग्रामीण भाग असल्यामुळे मुली स्वभावाने लाजऱ्या असतात असे वाटते. एकतीस टक्के शिक्षकांना सामाजिक परंपरांमुळे मुले-मुली एकत्र येण्यास लाजतात असे वाटते. दहा टक्के शिक्षकांना सावित्रीबाई फुले योजनेस पालकांचे सहकार्य मिळत नाही असे वाटते.

५. गावपातळीवर स्त्री-पुरूष समानतेचे कार्यक्रम घेतल्यास स्त्रीयांचे प्रमाण कमी व कर्तृत्ववान स्त्रीयांना शाळेत बोलावून समारंभ करणे आर्थीक दृष्ट्या परवडत नाही असे प्रत्येकी दोन टक्के शिक्षकांना वाटते.

६. पंचेचाळीस टक्के शिक्षक मुला-मुलींना प्रोत्साहन देतात. एकवीस टक्के शिक्षक, " शिक्षक पालक सभेचे " आयोजन करतात. हे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे, त्यामुळे ग्रामीण भागातील पालकांना स्त्री-पुरूष समानतेविषयी अधिक माहिती होईल.

७. थोर व्यक्तींचे चरित्र सांगणे व राष्ट्रीय सण समारंभातून मुला-मुलींना कार्यक्रमांत एकत्र आणणे यासाठी प्रत्येकी १७ टक्के शिक्षकांनी प्रयत्न केले आहेत. हे प्रमाण अत्यल्प आहे.

## ६.०६ मूल्यशिक्षण, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम यांचा संबंध -

१. पंचावन्न टक्के शिक्षकांना मूल्यशिक्षण व अभ्यासक्रम यांचा समन्वय साधता येतो असे वाटते तर पाच टक्के शिक्षकांना तो साधता येत नाही असे वाटते.

२. चोपन्न टक्के शिक्षकांना पाठ्य घटकांचा व मूल्यांचा समवाय साधता येतो. सतरा टक्के शिक्षक प्रसंगानरूप कथा सांगतात. एकोणीस टक्के शिक्षक विज्ञानातील विविध प्रयोग घेतात. दहा टक्के शिक्षक पाठ्य घटक संपल्यानंतर गृहपाठ देतात. हे दोन्ही प्रमाण खूप कमी आहे असे दिसून येते.

३. शहात्रव टक्के शिक्षक पाठ्यपुस्तकांद्वारे मूल्यशिक्षण देतात तर चार टक्के शिक्षक पाठ्यपुस्तकांद्वारे मूल्यशिक्षण देत नाहीत.

४. शालेय विषयांतील वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांमध्ये अनेक मूल्ये समाविष्ट झालेली आहेत. त्यांचा शिक्षकांनी योग्य प्रमाणात अभ्यास केला आहे. शिक्षकांनी उदाहरणादाखल दिलेला प्रतिसाद हा मूल्य व घटक यांचा योग्य सहसंबंध दर्शवितो असे दिसून येते.

५. पाठ्यपुस्तकांद्वारे राष्ट्रभक्ती हे मूल्य रूजले जाईल असे १०० टक्के शिक्षकांना वाटते. तर श्रमप्रतिष्ठा, स्त्री-पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सौजन्यशीलता, वक्तशीरपणा ही मूल्ये पाठ्यपुस्तकांद्वारे रूजली जातील असे ८५ टक्के शिक्षकांना वाटते. सर्वधर्मसहिष्णुता व राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये पाठ्यपुस्तकांद्वारे रूजली जातील असे ९६ टक्के शिक्षकांना वाटते. ७८ टक्के शिक्षकांना निटनेटकेपणा हे मूल्य पाठ्यपुस्तकांद्वारे रूजले जाईल असे वाटते.

मुख्याध्यापकांना १० मूल्यांपैकी किती मूल्ये रूजली जातील व त्यांचे प्रमाण काय असेल ते खाली नमूद केले आहे.

६. श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मता ही मूल्ये ८८ टक्के या प्रमाणात रूजली जातील असे मुख्याध्यापकांना वाटते. स्त्री-पुरूष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वधर्मसहिष्णुता यांचे सरासरी प्रमाण ७८ टक्के आहे. तसेच संवेदनशीलता व सौजन्यशीलता यांचे प्रमाण अनुक्रमे ५२ टक्के व ५६ टक्के आहे. वक्तशीरपणा व निटनेटकेपणा यांचे प्रमाण अनुक्रमे ८४ टक्के व ९२ टक्के एवढे आहे.

वरील निष्कर्ष क्रमांक ५ व ६ वरून शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या मूल्यसंक्रमणाच्या बाबतीमध्ये तफावत आढळते पण ती खूपच कमी आहे. दोन्ही निष्कर्षावरून जवळ जवळ ९० टक्के मूल्ये रूजली जाऊ शकतात असे दिसून येते.

## ६.०७ मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन -

१. मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करत असताना ९२ टक्के शिक्षक निरीक्षण तंत्राचा, ८१ टक्के शिक्षक प्रासंगिक नोंदी तर ५१ टक्के शिक्षक मुलाखत या तंत्राचा वापर करतात असे आढळून आले.

२. पदनिश्चयन श्रेणी या तंत्राचा वापर ११ टक्के शिक्षक करतात.

३. मूल्यमापन तंत्र वापरताना ५७ टक्के शिक्षकांना अडचणी जाणवतात तर ४३ टक्के शिक्षकांना हे तंत्र वापरताना कोणत्याही अडचणी जाणवत नाहीत.

मूल्यमापन करत असताना येणाऱ्या अडचणींवरून खालील निष्कर्ष निघाले.

४. चवदा टक्के शिक्षकांना अचूक मूल्यमापन होत नाही असे वाटते.

५. एकोणवीस टक्के शिक्षकांना गुणदान करताना अडचणी जाणवतात.

६. बारा टक्के शिक्षकांना वर्गात विद्यार्थी संख्या अधिक असल्यामुळे अडचण जाणवते.

७. सतरा टक्के शिक्षकांना काही मूल्यांचे (राष्ट्रीय एकात्मता, संवेदनशीलता) मापन होत नाही असे वाटते.

८. चवदा टक्के शिक्षकांना विद्यार्थी मुलाखत घेताना स्पष्टपणे उत्तर देत नाहीत असे वाटते.

मूल्यमापन करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी खालील उपाययोजना केल्या त्यावरून खालील निष्कर्ष निघतात.

९. सरासरी ४० टक्के शिक्षक वर्षभर नोंद ठेवणे व गट पाडून नोंदी ठेवतात तर सरासरी १५ टक्के शिक्षक वर्गमंत्री नेमून व निरीक्षण तंत्राचा अवलंब करून मूल्यमापन करतात.

## ६.०८ मुख्याध्यापक वैयक्तिक माहिती विषयी निष्कर्ष -

१. मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता सर्वच मुख्याध्यापकांजवळ असल्याचे आढळून आले. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचे शेकडा प्रमाण खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| बी. ए. बी. एड. | ५६ टक्के |
| बी. एस्सी. बी. एड. | १६ टक्के |
| एम. ए. बी. एड. | १२ टक्के |
| एम. ए. एम. एड. | ०८ टक्के |
| बी. ए. बी. पी. एड. | ०८ टक्के |
| | १०० टक्के |

वरील शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेच्या प्रमाणावरून मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता योग्य आहे असे दिसून येते.

२. मुख्याध्यापकांच्या प्रशासनाची सरासरी ८.२२ वर्षे आहे. म्हणजेच ती ८ वर्ष आहे असे दिसून येते. मुख्याध्यापक होण्यासाठी माध्यमिक स्तरावर अध्यापनाचा किमान ५ वर्षे अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे एकूण अनुभवाची सरासरी १३ वर्ष होते.

३. पंचवीस शाळांमध्ये मुलांचे व मुलींचे शेकडा प्रमाण अनुक्रमे ५५.३४ टक्के व ४४.६६ टक्के एवढे आहे. दोन्ही प्रमाणांची तुलना करता हे प्रमाण योग्य आहे असे लक्षात येते.

४. पंचवीस शाळांपैकी ३ शाळा खास मुलींच्या आहेत त्यामुळे संस्थेने मुलींच्या शिक्षणाची विशेष काळजी घेतल्याचे अढळून आले.

५. माध्यमिक शाळासंहिते नुसार प्रत्येक शाळेमध्ये वर्गतुकड्यांच्या प्रमाणात शिक्षक असल्याचे अढळून आले.

## ६.०९ मूल्यशिक्षण नियोजनाबाबत निष्कर्ष -

१. शंभर टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षणाची प्रथम तासिका योग्य वाटते.

२. चोवीस टक्के मुख्याध्यापकांना प्रथम तासिकेला विद्यार्थी प्रसन्न असतात असे वाटते. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना दिवसाची सुरूवात चांगल्या विचारांनी होते असे वाटते. वीस टक्के मुख्याध्यापकांना सुरूवातीच्या तासात वातावरण निर्मिती होते व अध्ययन प्रक्रियेशी सांगड घालता येते असे वाटते.

३. चार टक्के मुख्याध्यापकांना वेळ अपूरा आहे म्हणून सुरूवातीची तासिका योग्य वाटते पण हे कारण योग्य वाटत नाही.

४. शंभर टक्के शाळांना मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन वर्षारंभी करावे वाटते. अशाप्रकारचे नियोजन शंभर टक्के शाळा वार्षिक नियोजन करतात असे अढळून आले.

५. अडुसष्ठ टक्के शाळा मूल्यशिक्षणाचे नियोजन करताना मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक मिळून चर्चा करतात व नंतर वार्षिक नियोजन करतात.

६. मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन करताना १२ टक्के शाळामध्ये स्वतः मुख्याध्यापक नियोजन करतात, तर २० टक्के शाळांमध्ये सहशिक्षक नियोजन करतात असे दिसून आले. मूल्यशिक्षणाचे नियोजन करताना सर्वांनी चर्चा करून नियोजन करणे अधिक योग्य आहे.

७. मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन करताना जाणवणाऱ्या त्रूटींचे स्वरूप व प्रमाण खालील प्रमाणे दिसून आले.

| | |
|---|---|
| वेळ अपूरा वाटतो | २० टक्के |
| साहित्य अपूरे आहे | २८ टक्के |
| निश्चित अभ्यासक्रम नाही | ०८ टक्के |
| प्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण कमी | ३२ टक्के |
| अचूक मूल्यमापन करताना अडचणी जाणवतात | १२ टक्के |

८. विद्यार्थी गट पाडणे व शाळेच्या वेळे व्यतिरिक्त कार्यक्रम घेणे यांसाठी अनुक्रमे २४ टक्के व ३२ टक्के शाळा प्रयत्न करतात असे अढळून आले.

९. सामूहिक कार्यक्रमांचे आयोजन करणे व प्रशिक्षित शिक्षकांनी इतरांना माहिती देणे यांसाठी अनुक्रमे १६ टक्के व १८ टक्के मुख्याध्यापक प्रयत्न करतात असे दिसून आले.

## ६.१० मूल्यशिक्षणाची प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी प्रशिक्षण वर्गासाठीचे निष्कर्ष -

१. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी ९६ टक्के मुख्याध्यापकांना शिक्षकांनी प्रशिक्षण घेणे गरजेचे वाटते. तर ४ टक्के मुख्याध्यापकांना प्रशिक्षणाची आवश्यकता वाटत नाही.

वरील दोन्ही प्रमाणांचा विचार करता प्रभावीपणे कार्यवाही करण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे असे संशोधकास वाटते.

२. चौऱ्याऐंशी टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण शासनाने द्यावे असे वाटते. शासकीय पातळीवर प्रशिक्षण वर्ग अधिक प्रमाणात घेणे आवश्यक आहे. वर्ग अधिक प्रमाणात राबविणे शक्य नाही.

३. सामाजिक संस्था व मुख्याध्यापक संघाने प्रशिक्षण द्यावे असे वाटणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रतिसाद प्रमाण अनुक्रमे ८ टक्के व १२ टक्के आहे.

४. छत्तीस टक्के मुख्याध्यापकांना मूल्यशिक्षण प्रशिक्षण शैक्षणिक संस्थांनी द्यावे असे वाटते. शैक्षणिक संस्थेकडे प्रशासनाची जबाबदारी अधिक असल्यामुळे प्रशिक्षण वर्ग अधिक प्रमाणात राबविणे शक्य नाही.

५. सामाजिक संस्था व मुख्याध्यापक संघाने प्रशिक्षण द्यावे असे वाटणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रतिसाद प्रमाण अनुक्रमे ८ टक्के व २१ टक्के आहे. मुख्याध्यापक संघाने व सामाजिक संस्था (रोटरी क्लब, लायन्स क्लब, वैद्यकीय संघटना) यांनी पुढाकार घेऊन प्रशिक्षण वर्ग घेणे आवश्यक आहे.

६. शिक्षक संघाने प्रशिक्षण द्यावे असे ४ टक्के मुख्याध्यापकांना वाटते. पण असे कार्य शिक्षक संघाने केल्याचे निदर्शनास आले नाही.

७. प्रशिक्षण कालावधीचे स्वरूप व शिक्षकसंख्या याचे खालीलप्रमाणे दिसून आले.

| | |
|---|---|
| एक दिवस | ५७ टक्के (शिक्षक संख्या) |
| दोन दिवस | २४ टक्के (शिक्षक संख्या) |
| एकही दिवस नाही | १९ टक्के (शिक्षक संख्या) |

एकही दिवस प्रशिक्षण न घेतलेल्या शिक्षकांचे प्रमाण १९ टक्के आहे. हे प्रमाण कमी वाटत असले तरीसुद्धा १० शाळांमधील एकाही शिक्षकाला प्रशिक्षण मिळाले नाही असे दिसून येते.

## ६.११ विद्यालयामध्ये राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल निष्कर्ष -

१. विद्यालयामध्ये दैनंदिन परिपाठ घेण्याचे प्रमाण १०० टक्के आहे.

२. मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारी व्याख्याने ९२ टक्के विद्यालयांमध्ये आयोजित केली जातात. हे प्रमाण समाधानकारक आहे.

३. वैज्ञानिक दृष्टिकोन. श्रमप्रतिष्ठा इत्यादी मूल्यांसाठी आवश्यक असणारे प्रात्यक्षिक राबविण्याचे प्रमाण ५२ टक्के आहे. हे प्रमाण वाढणे आवश्यक आहे कारण कृतींद्वारे मूल्यसंक्रमण होऊ शकते.

## ६.१२ मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारी भौतिक सुविधांबाबत निष्कर्ष -

१. ब्यान्नव टक्के विद्यालयांना पुरेसे मैदान आहे तर ८ टक्के विद्यालयांना पुरेसे मैदान नाही. सर्वच विद्यालयांना मैदान आवश्यक आहे.

२. आठ टक्के विद्यालयाला सभागृहाची सोय आहे. तर ९२ टक्के विद्यालयांना सभागृहाची सोय उपलब्ध नाही. सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सभागृह असणे अधिक चांगले.

३. ऐंशी टक्के विद्यालयांमध्ये विज्ञान प्रयोगशाळांची सोय आहे. वीस टक्के विद्यालयांमध्ये विज्ञान प्रयोग शाळा नाही. प्रत्येक विद्यालयात किमान ३ विषयांसाठी एक तरी प्रयोगशाळा विज्ञान विषयाचे प्रयोग करण्यासाठी आवश्यक आहे.

४. शहात्तर टक्के विद्यालयांना स्वतंत्र ग्रंथालय आहे. चोवीस टक्के विद्यालयांना स्वतंत्र ग्रंथालय नाही. मूल्यशिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी संदर्भ साहित्याचा वापर शिक्षकांनी अधिक प्रमाणात करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र ग्रंथालय प्रत्येक शाळेमध्ये आवश्यक आहे.

५. बहात्तर टक्के ग्रंथालयांमध्ये पुरेसे संदर्भ ग्रंथ आहेत तर २८ टक्के ग्रंथालयांत पुरेसे संदर्भ ग्रंथ नाहीत.

विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासामध्ये संदर्भ ग्रंथ महत्वाचे कार्य करतात त्यामुळे मुबलक प्रमाणात संदर्भ ग्रंथ

असणे आवश्यक आहे.

६. अडुसष्ठ टक्के विद्यालयांमध्ये मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका आहे तर ३२ टक्के विद्यालयांमध्ये मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका उपलब्ध नाहीत. मूल्यशिक्षण कार्यवाही प्रभावीपणे करण्यासाठी हस्तपुस्तिका असणे गरजेचे आहे.

७. विद्यालयांमधील ग्रंथ प्रकारानुसार संख्या पुढील प्रमाणे दिसून आली.

| | |
|---|---|
| १. चरित्रे - | ६५ टक्के |
| २. आत्मचरित्रे - | १८ टक्के |
| ३. सुभाषित संग्रह - | ७ टक्के |
| ४. मासिके - | ४ टक्के |
| ५. साप्ताहिके व वर्तमानपत्रे - | ६ टक्के |

वरील ग्रंथप्रकारांमध्ये सुभाषित संग्रहाचे प्रमाण ७ टक्के असले तरी सुद्धा ते योग्य आहे कारण इतर ग्रंथांच्या तुलनेत ती कमी प्रमाणात उपलब्ध असतात.

वर्तमान पत्रांचा वापर योग्य प्रमाणात केल्याचे दिसून येते कारण दैनिक वर्तमान पत्रांमध्ये दिनविशेष, आजचा दिवस, तपमान, बोध कथा इत्यादी मूल्यशिक्षणासाठीची माहिती वर्तमानपत्रांमध्ये असते.

८. ग्रंथालय वापराच्या बाबतीत ५६ टक्के विद्यालयांमध्ये नियोजन केले जाते तर ४४ टक्के विद्यालयांमध्ये कोणत्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही. सूत्रबद्ध नियोजन केल्यास ग्रंथालयाचा वापर योग्य पद्धतीने होऊ शकतो. त्यासाठी सर्वच विद्यालयांनी ग्रंथालय वापराचे नियोजन केले पाहिजे.

९. शिक्षक व विद्यार्थ्यांना स्वतंत्र वेळ देऊन ग्रंथालयाचा वापर करण्याचा प्रयत्न ४० टक्के मुख्याध्यापक करतात. पुस्तकांची डिमांड घेऊन १६ टक्के मुख्याध्यापक ग्रंथालय वापराचे नियोजन करतात.

१०. कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद ४४ टक्के मुख्याध्यापकांनी दिला नाही यावरून संदर्भ साहित्य उपलब्ध असून सुद्धा ते योग्यप्रकारे वापर करत नाहीत असे स्पष्ट होते.

## ६.१३ मूल्यशिक्षण कार्यवाहीवर परिणाम करणाऱ्या घटकांवर निष्कर्ष -

१. बावन्न टक्के मुख्याध्यापकांना संदर्भ ग्रंथांची कमतरता जाणवते. ऐंशी टक्के मुख्याध्यापकांना शैक्षणिक साधनांचा अभाव ही अडचण जाणवते. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना कालावधी अपूरा वाटतो.

मूल्यशिक्षणावर परिणाम करणाऱ्या घटकांवरून खालील निष्कर्ष निघतात.

२. विद्यार्थी अफाट संख्या, महागडे शिक्षण, अस्थिर कौटुंबिक परिस्थिती यांसाठी सरासरी ४२ टक्के मुख्याध्यापकांनी प्रतिसाद दिला आहे.

३. छत्तीस टक्के मुख्याध्यापकांना वर्गात विद्यार्थी संख्या नियंत्रित असावी असे वाटते. चाळीस टक्के मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती वाढवाव्यात असे वाटते.

४. अभ्यासक्रम पुनर्रचना करावी असे २८ टक्के मुख्याध्यापकांना वाटते, तर पालकांचा आर्थिक दर्जा सुधारणे आवश्यक आहे असे ८ टक्के मुख्याध्यापकांना वाटते.

शासनाने ठरवून दिलेली दहा मूल्ये किती प्रमाणात रूजली जातील हे निष्कर्ष क्रमांक ६.०६ मधील ६ मध्ये दिले आहे. जी मूल्ये रूजली जाण्याचे प्रमाण कमी आहे त्याची कारणे कोणती ते खालील निष्कर्षावरून स्पष्ट होते.

५. बत्तीस टक्के मुख्याध्यापकांना मूल्य संक्रमणासाठी वेळ अपूरा पडतो असे वाटते. अठ्ठावीस टक्के मुख्याध्यापकांना विद्यार्थ्यांना व्यवस्थीत मार्गदर्शन मिळत नाही असे वाटते.

६. सामाजिक परिवर्तन घडून येत नाही व शालाबाह्य प्रयत्न होत नाही असे अनुक्रमे ३२ टक्के व २४ टक्के मुख्याध्यापकांना वाटते.

७. छत्तीस टक्के मुख्याध्यापकांनी मूल्य संक्रमण न होण्यासाठी कोणताही प्रतिसाद नोंदवीला नाही.

## ६.१४ मूल्यशिक्षणामुळे एस. एस. सी. परीक्षेवर होणाऱ्या परिणामांवरती निष्कर्ष

१. अठ्ठेचाळीस टक्के मुख्याध्यापकांना टक्केवारी वाढेल असे वाटते.

२. मूल्यशिक्षणामुळे एस. एस. सी. परीक्षेवरती कोणताही परिणाम होणार नाही असे ५२ टक्के मुख्याध्यापकांना वाटते.

## ६.१५ विद्यालयांना दिलेल्या भेटी व निरक्षणातील माहितीचे निष्कर्ष -

१. नव्वद टक्के विद्यालयांमध्ये मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन केले जाते.

२. मूल्यशिक्षण कार्यवाही करण्यासाठी प्रत्येक विद्यालयातील २ ते ३ शिक्षकांना प्रशिक्षण मिळाले आहे.

३. ऐंशी टक्के विद्यालयांना पुरेसे मैदान उपलब्ध आहे.

४. वीस टक्के विद्यालयांना स्वतंत्र सांस्कृतिक सभाग्रह उपलब्ध आहे.

५. चाळीस टक्के विद्यालयांमध्ये स्वतंत्र ग्रंथालय आहे.

६. ऐंशी टक्के विद्यालयांमध्ये मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

७. शंभर टक्के विद्यालयांमध्ये शालेय परिपाठाचे आयोजन केले आहे.

८. पंच्याऐंशी टक्के विद्यालयांनी श्रमदानातून वृक्षारोपण केले आहे.

९. ऐंशी टक्के विद्यालयांमध्ये भिंती बोलक्या होत्या.

१०. नव्वद टक्के विद्यालयांमध्ये दिनविशेष, विशेषदिन, सुविचार, आजचे पंचांग इत्यादी माहितीसाठी फलक होते व त्यांवर माहितींची नोंद केल्याचे अढळून आले.

११. पन्नास टक्के शाळांमध्ये काच फलकात विज्ञान विषयीच्या लेखांची कात्रणे दिसून आली.

१२. पन्नास टक्के शाळांमध्ये श्रमप्रतिष्ठा उपक्रमांसाठी आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध असल्याचे आढळून आले.

## ६.१६ पर्यवेक्षक व तज्ञ यांच्या मुलाखती मधून निघालेले निष्कर्ष -

१. पूर्वीपासून मूल्यशिक्षण अभ्यासक्रमातून दिले जाते पण सद्या मूल्यांच्या होणाऱ्या ऱ्हासामुळे ते विशेष उपक्रमांद्वारे देणे आवश्यक आहे.

२. मूल्यशिक्षण विद्यालयामध्ये प्रभावीपणे देण्यासाठी वेगवेगळया उपक्रमांचे आयोजन करावे. त्यामध्ये शालेय परिपाठ, तज्ञ व्यक्तींचे व्याख्याने, श्रमदान शिबीर, विज्ञान विषयक अभ्यासक्रमेतर प्रयोग विद्यालयामध्ये द्यावेत.

३. मूल्यसंक्रमण व्यवस्थीतपणे होण्यासाठी माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार करण्याची आवश्यकता आहे.

४. मूल्यशिक्षणाचे वेगवेगळे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणामध्ये मूल्यांची जाणीव करून देणे, कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी उपक्रमांचे स्वरूप समजावून

देणे, मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन कशाप्रकारे करावे यासाठी माहिती देणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाची जबाबदारी संस्थापातळीवर तसेच शासनाने संयुक्तपणे घेणे आवश्यक आहे.

५. मूल्यशिक्षण व अभ्यासक्रमातील पाठ्यघटकांचा सहसंबंध शिक्षक त्या त्या वेळी स्पष्ट करतात.

६. मूल्यमापन करताना निरीक्षण तंत्राचा व प्रासंगिक नोंदीचा वापर अधिक प्रमाणात केला जातो असे आढळून आले.

७. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी विद्यालयाला पुरेसे मैदान, सभागृह, विज्ञान प्रयोगशाळा, तसेच श्रमदानासाठी आवश्यक हत्यारे असणे आवश्यक आहेत.

८. वेगवेगळी मूल्ये रूजविण्यासाठी प्रत्येक वर्षी वेगवेगळे उपक्रम घ्यावेत व त्यासाठी विद्यालयांना स्वातंत्र्य असावे.

९. नव्वद टक्के विद्यालयांनी मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणारे संदर्भ साहित्य खरेदी केले आहे.

१०. मूल्यशिक्षण सुरू झाल्यापासून विद्यार्थ्यांना शिस्तीचे, विज्ञान विषयांचे, स्त्री-पुरूष समानतेचे, वक्तशीरपणाचे महत्व चांगल्याप्रकारे समजू लागले आहे.

११. मूल्यशिक्षणाचे उपक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी संस्था पातळीवर शिक्षकांना प्रशिक्षण दिले. तसेच संदर्भ साहित्य खरेदी करण्यास पूर्ण परवानगी आहे.

१२. मूल्यशिक्षणाचे उपक्रम राबवित असताना उपक्रमांमध्ये तोच तो पणा येणार नाही याची काळजी शाळांनी घेणे आवश्यक आहे.

१३. मूल्यसंक्रमणाचे मूल्यमापन करण्यासाठी मूलाखती, पदनिश्चयन श्रेणी, प्रासंगिक नोंदी, निरीक्षण, पडताळासूची इत्यादी साधनांचा उपयोग करावा.

१४. संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा करत असताना " आनंदयात्रा " या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना चार दिवसांचे स्वतंत्र शिबीर आयोजित केले त्यामध्ये २०,००० विद्यार्थी विद्यार्थीनी व शिक्षकांनी भाग घेतला.

# विभाग ब

# शिफारशी

## ६.१७ मूल्यशिक्षण प्रशिक्षण (उद्‌बोधन वर्गाबाबत) शिफारशी -

१. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी सर्वच विद्यालयांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले पाहिजे.

२. मूल्यशिक्षण प्रशिक्षण अधिक शिक्षकांना मिळण्यासाठी संस्था पातळीवर, शासकीय पातळीवर, सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

३. प्रशिक्षण (उद्‌बोधन वर्ग) कालावधी २,३ दिवस न ठेवता कमीत कमी ८ दिवसांचा कालावधी असावा.

४. मूल्यशिक्षण प्रशिक्षणामध्ये मूल्यशिक्षण संकल्पना स्पष्ट करणे, मूल्यमापन व्यवस्थीत करणे यांवरती भर देणे आवश्यक आहे.

५. मूल्यशिक्षण प्रशिक्षणाची संधी प्रत्येक शाळेने जास्तीत जास्त शिक्षकांना द्यावी.

## ६.१८ मूल्यशिक्षण कार्यवाही बावत शिफारशी -

### ६.१८.०१ - शालेय परिपाठाविषयी शिफारशी -

१. पसायदान / मनाचे श्लोक यांचे प्रमाण (६२ टक्के) आहे हे प्रमाण प्रत्येक शाळांनी वाढवावे.

२. मौन या उपक्रमासाठी (५८ टक्के) प्रतिसाद आहे हे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे कारण मनाची एकाग्रता निर्माण करण्यास मौन हे महत्वाचे ठरणार आहे.

३. प्रत्येक शाळांनी शाळा सुटताना " वंदे मातरम् " म्हणणे आवश्यक आहे.

### ६.१८.०२ - श्रमप्रतिष्ठा या उपक्रमांविषयी शिफारशी -

१. प्रत्येक शाळांनी वर्षातून कमीत कमी एकदा तरी दोन दिवसांच्या श्रमदान शिबीराचे आयोजन करावे. त्यामध्ये श्रमाचे महत्व पटवून द्यावे. विद्यार्थ्यांना श्रम करण्यास प्रवृत्त करावे.

२. श्रमदानासाठी पाट्या, खोरे, टिकाव, खुरपी, पाण्याची सोय प्रत्येक शाळांनी करावी. हे साहित्य विद्यार्थ्यांना घरुन आणण्यास सांगू नये.

३. विद्यार्थ्यांचे गट पाडून कामाची विभागणी करण्याचे प्रमाण वाढवावे त्यामुळे विद्यार्थ्यांना काम करताना उत्साह येईल.

४. शिक्षक पालक सभांचे आयोजन करताना पालकांना श्रमप्रतिष्ठेविषयी स्पष्ट कल्पना द्यावी त्यामुळे विद्यार्थी काम करण्यास नकार देणार नाहीत.

५. शाळांच्या वेळा व्यतिरिक्त उपक्रम राबवावयाचे असल्यास ते श्रमदान शिबीर घेऊन राबवावेत त्यामुळे वेळेची बचत होईल.

## ६.१८.०३ - वैज्ञानिक दृष्टिकोन या उपक्रमाविषयी शिफारशी -

१. स्वच्छ हवा, पाणी व परिसर यांचे महत्व पटवून देण्यासाठी आरोग्य सप्ताह सर्वच शाळांनी साजरे करावेत. त्यासाठी रोटरी, लायन्स क्लब यांसारख्या संस्थांची मदत घ्यावी.

२. संस्थेने प्रत्येक शाळेमध्ये तीन विषयांसाठी किमान एक विज्ञान प्रयोगशाळा तयार करावी. पुरेसे विज्ञान साहित्य शाळांना उपलब्ध करून द्यावे.

३. प्रत्येक शाळेने विज्ञान मासिके मागवावीत. त्यांमध्ये मराठी विज्ञान परिषदचे मासिक, **Science Today** इत्यादीचा समावेश करावा.

४. विज्ञान विषयीचे लेख वर्तमानपत्रांतून एकत्र करून विद्यार्थी हस्तलिखीत तयार करावे.

५. प्रत्येक शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विषयाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करून दाखवावेत व त्यांमध्ये विद्यार्थी सहभाग घ्यावा.

६. आंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्यक्रम शाळांनी गावपातळीवर तसेच विद्यालयामध्ये घ्यावेत.

७. टाकावू पासून टिकावू वस्तू तयार करण्यासाठी टाटा मूलभूत संशोधन केंद्राच्या संवाद या पुस्तिकेचा वापर करावा.

## ६.१८.०४ - वक्तशीपरणा या उपक्रमाविषयी शिफारशी -

१. प्रत्येक विद्यालयांनी गृहपाठ वेळच्या वेळेला विद्यार्थ्यांना द्यावेत. तसेच त तपासण्याचे काम वेळीच पूर्ण करावे.

२. ग्रामीण भागात शाळां अधिक असल्यामुळे इयत्ता ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांची वसतिगृहात राहण्याची सोय करावी.

३. वेळच्यावेळी अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. नियमित अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करावे.

४. ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती बेताची आहे अशा विद्यार्थ्यांना शाळे मार्फत मोफत किंवा कमी दराने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.

५. सौम्य स्वरूपाची शिक्षा सुद्धा करू नये त्याऐवजी विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमाची गोडी कशी निर्माण होईल ते पहावे.

## ६.१८.०५ - स्त्री-पुरुष समानता उपक्रमाविषयी शिफारशी -

१. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना विद्यालयांमध्ये अधिक प्रमाणात राबविण्यात याव्यात. त्यासाठी गावपातळीवर पालकांना प्रोत्साहित करावे.

२. मुले-मुली एकत्र करून सहभोजन कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन योग्य प्रमाणात करावे.

३. वर्गातील बुजऱ्या मुला-मुलींना शालेय कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घेण्याचे प्रमाण वाढवावे.

४. मुले व मुली असा भेदभाव शिक्षकांनी करू नये. त्यांच्यामध्ये समानता कशी निर्माण करता येईल यांविषयी प्रयत्न करावेत.

५. कर्तृत्ववान स्त्रीयांना शाळेत आणून सत्कार करून उचित कौतुक करावे.

६. इतिहासातील कर्तृत्ववान स्त्री-पुरुषांची चरित्रे विद्यार्थ्यांना अभ्यासण्यास द्यावीत.

७. शिक्षक पालक सभेत मुला मुलींच्या समानतेची स्पष्ट कल्पणा करून द्यावी. त्यामुळे पालक मुलींना वेगळी वागणूक देणार नाहीत.

## ६.१९ मूल्यशिक्षण, अभ्यासक्रम व पाठ्यक्रम याविषयी शिफारशी -

१. मूल्याशिक्षण व अभ्यासक्रम यांचा घनिष्ठ संबंध आहे त्यासाठी प्रत्येक शिक्षकांनी त्या सहसंबंधाचा अभ्यास करावा.

२. एखाद्या पाठ्यघटकामध्ये मूल्य समाविष्ट असेल तर त्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावी.

३. विज्ञान विषयाचे वेगवेगळे प्रयोग मुलांना करण्यास द्यावेत.

४. प्रत्येक पाठ्यघटक शिकवून झाल्यानंतर विद्यार्थ्यांना गृहपाठ द्यावा.

५. विद्यार्थ्यांना निटनेटकेपणा विषयी महत्व वाटण्यासाठी पाठ्यपुस्तकातील योग्य घटकांचे दाखले द्यावेत त्याच बरोबर शालेय गणवेश व्यवस्थीत ठेवण्यास सांगावे, विद्यार्थाला स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे.

## ६.२० मूल्यसंक्रमण व मूल्यमापन याविषयी शिफारशी -

१. बहुतेक शिक्षक निरीक्षण तंत्राचा वापर अधिक प्रमाणात करतात पण त्याऐवजी मुलाखती, प्रासंगिक नोंदी, पदनिश्चयन श्रेणी यांचा वापर अधिक प्रमाणात शिक्षकांनी करावा.

२. मूल्यसंक्रमणाचे अचूक मूल्यमापन होण्यासाठी प्रत्येक वर्गात विद्यार्थी संख्या मर्यादीत असावी. त्यासाठी शाखा प्रमुखांनी विशेष लक्ष द्यावे.

३. मुलाखत घेताना विद्यार्थी स्पष्टपणे उत्तर देत नसतील तेंव्हा आपण त्यांची उलट तपासणी घेत नाही ना याची खात्री करावी.

४. वर्गमंत्री नेमूण नोंद ठेवणे अशाप्रकारे मूल्यमापन शिक्षकांनी करू नये त्याऐवजी विद्यार्थ्यांचे योग्य गट पाडून नोंदी ठेवाव्यात.

५. मूल्यमापन तंत्र अचूक समजावून घेण्यासाठी प्रशिक्षीत शिक्षकांची मदत घ्यावी.

## ६.२१ मूल्यशिक्षणाच्या वार्षिक नियोजनाविषयी शिफारशी -

१. मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन एकट्या मुख्याध्यापकाने करू नये.

२. मूल्यशिक्षणाचे वार्षिक नियोजन करताना विद्यालयामधील सर्व शिक्षकांशी चर्चा करून वार्षिक नियोजन करावे.

३. मूल्यशिक्षण नियोजन करत असताना वेळ अपूरा वाटत असल्यास उपक्रमांची पुनरावृत्ती टाळावी.

४. मूल्यशिक्षणाची कार्यवाही व्यवस्थीत होण्यासाठी प्रशिक्षीत शिक्षकांचे प्रमाण अधिक हवे.

५. मूल्यशिक्षणाचा निश्चित अभ्यासक्रम नाही. त्यासाठी मुख्याध्यापक संघाने निश्चित अभ्यासक्रम तयार करण्यासाठी अभ्यासक्रम मंडळाकडे मागणी करावी.

६. मूल्यशिक्षणाचे कार्यक्रम प्रभावीपणे घेण्यासाठी सामुहिक कार्यक्रमांचे आयोजन करावे.

## ६.२२ मूल्यशिक्षण व शिक्षकांचे उद्‌बोधन यासाठी शिफारशी -

१. संस्था पातळीवर तज्ञ व्यक्तींची निवड करून सुट्टीच्या कालावधीमध्ये कमीत कमी ७ दिवसांचे प्रशिक्षण द्यावे. त्याचे स्वरूप SMART PT सारखे असावे.

२. मुख्याध्यापक संघ, शिक्षक संघ, जिल्हा शिक्षण विस्तार केंद्र यांमार्फत शिक्षकांना मूल्यशिक्षणाचे प्रशिक्षण

द्यावे. त्यांमध्ये मूल्यसंकल्पणा, कार्यवाही, मूल्यमापण यांचा समावेश प्रामुख्याने असावा.

३. प्रत्येक शाळेमधील एक किंवा दोन शिक्षकांनी तेही कमी कालावधीचे प्रशिक्षण घेऊन चालणार नाही त्यासाठी शाळेतील जास्तीत जास्त शिक्षकांनी प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

## ६.२३ विद्यालयामध्ये मूल्यशिक्षणाच्या राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाविषयी शिफारशी -

१. विद्यालयांनी दैनंदिन परिपाठ, व्याख्याने या उपक्रमांचे आयोजन करावे पण त्याच बरोबर प्रात्यक्षिक कार्य विद्यार्थ्यांकडून अधिक प्रमाणात करून घ्यावे. कृतींमधून अधिक प्रमाणात मूल्यसंक्रमण होऊ शकते.

## ६.२४ मूल्यशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधा विषयी शिफारशी

१. आठ टक्के विद्यालयांना पुरेसे मैदान नाही. या विद्यालयांनी संस्था पातळीवर विशेष प्रयत्न करून विद्यालयांना मैदान उपलब्ध करून द्यावे.

२. ब्यान्नव टक्के विद्यालयांना पुरेसे सभागृह नाही अशा विद्यालयांना ग्राम पंचायतिच्या सहकार्यातून योग्य वेळी समाज मंदीराचा वापर करून ही अडचण दूर करावी.

३. वीस टक्के विद्यालयांना स्वतंत्र प्रयोगशाळा नाही. विज्ञान विषयाचे प्रयोग सुव्यवस्थीतपणे करण्यासाठी किमान तीन विषयांसाठी एक प्रयोगशाळा तयार करून द्यावी.

४. चोवीस टक्के विद्यालयांना स्वतंत्र ग्रंथालय नाही अशा विद्यालयांनी स्वतंत्र ग्रंथालयाची सोय करावी.

५. अठ्ठावीस टक्के ग्रंथालयात पुरेसे संदर्भग्रंथ नाहीत. मूल्यशिक्षणाचा उचित अभ्यास करण्यासाठी दरवर्षी योग्य प्रमाणात ग्रंथ खरेदी करावेत. त्यासाठी संस्थेची परवानगी घ्यावी व तशी मागणी संस्था पातळीवर मुख्याध्यापकांनी करावी. ६. बत्तीस टक्के शाळांमध्ये मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका नाही. किमान कार्यक्रमांची माहिती होण्यासाठी या शाळांनी मूल्यशिक्षण हस्तपुस्तिका खरेदी करावी.

७. विद्यालयांमध्ये मासिकांची संख्या खूपच कमी (४ टक्के) आहे. शाळांनी वेगवेगळी मासिके अधिक प्रमाणात खरेदी करावीत. त्यांचा उपयोग शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी करता येतो.

८. चव्वेचाळीस टक्के शाळांमध्ये ग्रंथालयाचे कोणत्याही प्रकारचे नियोजन केले जात नाही. ग्रंथालयाचे नियोजन योग्य प्रकारे होण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेच्या आधारे ग्रंथपाल नेमावेत किंवा आवड असणाऱ्या शिक्षकांकडे त्याचा जादा अधिभार सोपवावा.

## ६.२५ मूल्यशिक्षण कार्यवाही बाबत शिफारशी -

१. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे होण्यासाठी शासनाने प्रथम तासिका ठरवून दिलेली आहे. त्यापेक्षा अधिक वेळ मूल्यशिक्षणासाठी देणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाची रचना करणे आवश्यक आहे.

२. प्रत्येक विद्यालयातील प्रत्येक तुकडीत मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थीसंख्या आहे त्यामुळे शिक्षकांना प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देता येत नाही. त्यासाठी विद्यार्थी संख्या मर्यादीत ठेवणे आवश्यक आहे.

३. मुल्यसंक्रमण होण्यासाठी कालबाह्य अध्यापन पद्धतीचा शिक्षकांनी त्याग करणे आवश्यक आहे.

५. मुल्यसंक्रमण होण्यासाठी शाळाबरोबर पालकांनीसुद्धा प्रयत्न करणे आवश्यक आहे कारण शाळेच्या वेळेशिवाय विद्यार्थी पालकासमेवत अधिक प्रमाणात सानिध्यात असतो.

## ६.२६ मूल्यशिक्षणामुळे एस. एस. सी. परीक्षेवरती होणाऱ्या परिणामांविषयीच्या शिफारशी -

१. मूल्यशिक्षणाची कार्यवाही प्रभावीपणे व विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संक्रमण झाल्यास एस. एस. सी. परीक्षेवरती नक्कीच परिणाम होईल, विद्यार्थ्यांची बौद्धिक कुवत वाढेल त्यामुळे टक्केवारी वाढेल पण शिक्षकांनी योग्य दृष्टीने मूल्यसंक्रमण करावे.

# विभाग " क "

## " पुढील संशोधनासाठी विषय "

मूल्यशिक्षणाची व्याप्ती फार मोठी आहे. ही व्याप्ती कमी करुन संशोधकाने प्रस्तुत संशोधन केलेले आहे.प्रस्तुत संशोधन माध्यमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षण कार्यवाही इतकेच मर्यादीत आहे. शिक्षणाच्या विविध स्तरांवर मूल्यशिक्षण आढळते. वेगवेगळ्या स्तरावरील व क्षेत्रांमधील मूल्यशिक्षणाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन करत असताना संशोधकाला विविध स्तरांवरील मूल्यशिक्षणाचा अभ्यास करणे शक्य झाले नाही. विविध स्तरांवरील व क्षेत्रांमधील मूल्यशिक्षणाचा अभ्यास व्हावा असे संशोधकास वाटते प्रस्तुत संशोधन करीत असतांना संशोधकास मूल्यशिक्षणाविषयी असे काही विषय आढळले की, त्यांवर प्रकाश टाकता येईल. ते विषय पुढे दिले आहेत.

### १) प्राथमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षण कार्यवाहीचा चिकित्सक अभ्यास

मूल्यशिक्षण देण्याची आवश्यकता ही लहान वयात होणे गरजेचे आहे. प्राथमिक स्तरावरील मुलांची मने कोवळी असतात. त्यांच्या मनावर एखादा संस्कार रुजला तर तो आयुष्यभर कायम राहतो. त्यांना सुसंस्कारीत प्राथमिक स्तरापासून करणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने मूल्यशिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केलेला आहे. त्याची प्रभावीपणे कार्यवाही होणे गरजेचे आहे.

प्राथमिक शाळांमध्ये मूल्यशिक्षणाची कार्यवाही कशाप्रकारे केली जाते. कार्यवाही करत असताना कोणकोणत्या समस्या जाणवतात त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे.

### २) माध्यमिक शाळांमध्ये अध्यापन करणा-या अध्यापकांचा मूल्यशिक्षण विषयाच्या दृष्टीकोणाचा चिकित्सक अभ्यास

माध्यमिक स्तरावर सन. १९९६ पासून मूल्यशिक्षणाची कार्यवाही सुरु केली आहे. शासनाने दहा मूल्ये ठरवून दिली आहेत. मूल्यशिक्षणासाठी वेगवेगळे उपक्रम सूचित केले आहेत हे उपक्रम योग्य आहेत का? नसल्यास त्यांमध्ये कोणते बदल आवश्यक आहेत. प्रत्येक वर्गाला स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासक्रमाची रचना करावी का त्याचा अभ्यासक्रम तयार केल्यानंतर मूल्यमापन कोणत्याप्रकारे करावे? मूल्यमापन करतांना कोणत्या अडचणी जाणवतील ? याचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे. मूल्यशिक्षणाची माध्यमिक स्तरावर आवश्यकता आहे का ? असल्यास ती किती प्रमाणात साध्य होऊ शकेल ? याचासुध्दा विचार करणे आवश्यक आहे.

## ३) प्राथमिक व माध्यमिक स्तरांवर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणामूळे होणा-या परिणामाचा तुलनात्मक अभ्यास

प्राथमिक स्तरावर तसेच माध्यमिक स्तरावर मूल्यशिक्षणाचा अभ्यासक्रम सध्या सुरु आहे. या अभ्यासक्रमामुळे प्राथमिक व माध्यमिक स्तरांवरील विद्यार्थ्यांमध्ये कोणकोणती मूल्ये संक्रमित झाली? त्यांचे प्रमाण किती आहे, याची तुलना करणे आवश्यक आहे. जी मूल्ये कमी प्रमाणात रुजली त्यांची कारणे कोणती, त्या कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे. मूल्य अधिक प्रमाणात संक्रमित होण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

## ४) माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यावरती शालाबाहय परिस्थितीचा मूल्यशिक्षणावरती होणा-या परिणामांचा चिकित्सक अभ्यास

मूल्यशिक्षणाची कार्यवाही शालेय पातळीवर होत आहे. विद्यार्थी हा शालेय वातावरणामध्ये जेवढा वेळ असतो; त्यापेक्षा अधिक वेळ समाजामध्ये असतो. त्यामध्ये त्याचा कुटूंब, मित्र यांचा सहवास जास्त असतो.त्यांच्या संस्कारावरती हे घटक अधिक प्रभावीपणे कार्य करत असतात. त्या परिणामांचा अभ्यास मूल्यसंक्रमणांच्या दृष्टीने आवश्यक आहे. कुटूंब, समाज,मित्र परीवार हे घटक परिणाम करत असतील तर त्यांचा प्रभाव धन आहे की ॠण आहे. याचा विचार होणे आवश्यक आहे त्याचबरोबर भौतिक परिस्थीती, सामाजिक वातावरण हे मूल्यसंस्कारावरती परिणाम करतात का हे पाहणे आवश्यक आहे.

## ५) उच्च माध्यमिक स्तरावरती मूल्यशिक्षणाची कार्यवाही करत असतांना येणा-या समस्यांचा चिकित्सक अभ्यास .

माध्यमिक शाळांमधील शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी आपल्या आवडीप्रमाणे वेगवेगळ्या शाखेमध्ये प्रवेश घेतो. त्या वेगवेगळ्या शाखेमध्ये शिकत असतांना त्याच्या वरती मूल्ये संस्कार होणे आवश्यक आहे. हे संस्कार कोणत्याप्रकारचे असावेत, ते कशा प्रकारे करावेत, ते करत असतांना कोणत्या समस्या निर्माण होऊ शकतील, त्या सोडविण्यासाठी कोणकोणत्या उपाय योजना करता येतील याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.